# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १४०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.२९ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## चिमुरडीवर अत्याचार प्रकरणी नराधमावर दोषारोप निश्चित, नसरापूर खटल्याची सुनावणी सुरू

पुणे दि.२८ (प्रतिनिधी)- राज्यभरात हळहळ व्यक्त झालेल्या नसरापूर येथील चिमुरडीवर अत्याचार करून खून करणाऱ्या नराधमावर दोषारोप निश्चित करण्यात आले आहेत. या खटल्याची सुनावणी पुणे येथील विशेष न्यायालयात सुरू झाली असून, न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याच्यावर दोषारोप निश्चित केले आहेत. घटनेचे गांभीर्य आणि संवेदनशीलता विचारात घेऊन या खटल्याची सुनावणी 'इन-कॅमेरा' (बंद खोलीत) दररोज घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. विशेष न्यायालयात सुनावणीच्या पहिल्या दिवशी आरोपी भीमराव कांबळे याला कडेकोट पोलीस बंदोबस्तात हजर करण्यात आले. विशेष सरकारी वकील अ‍ॅड. अजय मिसर यांनी सरकारपक्षातर्फे खटल्याचा सविस्तर घटनाक्रम मांडत 'ओपनिंग अ‍ॅड्रेस'चा युक्तिवाद केला. सरकारी वकिलांनी मांडलेल्या घटनाक्रमानुसार, १ मे रोजी दुपारी तीन ते चारच्या दरम्यान आरोपीने एका बालिकेला नसरापूर येथील राम मंदिरासमोरून गाईचे वासरू दाखवण्याच्या बहाण्याने फूस लावून पळवून नेले. त्यानंतर गाईच्या गोठ्याजवळील शेडमध्ये नेऊन तिच्यावर पाशवी लैंगिक अत्याचार केला. आरडाओरडा करू नये म्हणून त्याने बालिकेचे तोंड दाबले आणि छातीवर प्रहार करून तिचा निर्घृण खून केला. पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह लपवण्याचा प्रयत्नही आरोपीने केला. 'आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे आहेत. यामध्ये सीसीटीव्ही चित्रीकरण (ज्यात आरोपी बालिकेला घेऊन जाताना दिसत आहे आणि ते दोघे शेवटचे एकत्र दिसले होते), प्रत्यक्षदर्शी बालक आणि ग्रामस्थांचे जबाब, वैद्यकीय अहवाल, न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) व डीएनए रिपोर्ट, मयताचा पंचनामा आणि आरोपीच्या सांगण्यावरून जप्त केलेला मुद्देमाल यांचा समावेश आहे,' असे अ‍ॅड. अजय मिसर यांनी न्यायालयात सांगितले. सरकारपक्षाने एकूण ८२ साक्षीदारांची यादी न्यायालयात सादर केली आहे.

# पेट्रोल-डिझेलनंतर आता सीएनजी दरांचा भडका

## रिक्षा-टॅक्सी प्रवास महागणार? मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगरमध्येही दरवाढ

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे आधीच नागरिक त्रस्त असताना आता सीएनजीच्या दरवाढीने सर्वसामान्य वाहनधारकांची चिंता आणखी वाढली आहे. गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर वारंवार वाढल्यानंतर आता सीएनजीचे दरही भडकले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरसह अनेक शहरांमध्ये सीएनजीच्या किंमतीत वाढ झाल्याने रिक्षा, टॅक्सी आणि खासगी वाहनांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांच्या मासिक बजेटवर मोठा परिणाम होणार असल्याचे चित्र आहे.

पुण्यात एमएनजीएल कंपनीने सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपये ५० पैशांची वाढ जाहीर केली आहे. त्यामुळे शहरातील सीएनजीचा दर ९२ रुपये २५ पैशांवरून थेट ९४ रुपये ७५ पैशांवर पोहोचला आहे. वाढीव दर २७ मेच्या मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले. इनपुट गॅसचा खर्च वाढल्यामुळे ही दरवाढ करावी लागल्याचे स्पष्टीकरण कंपनीकडून देण्यात आले आहे. या वाढीचा थेट परिणाम रिक्षा, टॅक्सी चालकांसह दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांवर होणार आहे. प्रवासखर्च वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा कात्री लागणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्येही सीएनजीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. शहरातील चिकलठाणा परिसरातील बीपीसीएल पंपावर सीएनजीचे दर किलोमागे २ रुपयांनी वाढले आहेत. गेल्या १५ दिवसांत येथे सीएनजीच्या किंमतीत १२ रुपयांची वाढ झाल्याने वाहनधारक संतप्त झाले आहेत. शहरात सध्या पेट्रोल चा दर ११२ रुपये ८८ पैसे प्रति लिटर, तर डिझेलचा दर ९९ रुपये ५० पैसे इतका आहे. पेट्रोल-डिझेलनंतर आता सीएनजीही महाग झाल्याने पर्यायी इंधनाचा फायदा कमी होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. नाशिकमध्येही सीएनजीच्या दरात वाढ झाली असून प्रति किलो १ रुपया ३५ पैशांची वाढ नोंदवली गेली आहे. त्यामुळे शहरात सीएनजीचा नवा दर ९६ रुपये ५० पैसे प्रति किलो झाला आहे. यापूर्वी वाहनधारकांना ९५ रुपये १५ पैशांमध्ये सीएनजी उपलब्ध होत होते. २८ मेपासून नवीन दर लागू करण्यात आले आहेत. आखाती भागातील युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधन दरवाढ याचा परिणाम आता सीएनजीवरही होत असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, पेट्रोल, डिझेल आणि सीएनजी या तिन्ही इंधनांच्या वाढत्या दरांमुळे वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः रिक्षा, टॅक्सी आणि कॅब सेवांचे भाडे वाढण्याची शक्यता असल्याने सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. सीएनजीचे दर झपाट्याने वाढत असल्यामुळे हे इंधनही लवकरच शंभरी पार करेल, अशी भीती वाहनधारक व्यक्त करत आहेत. सततच्या इंधन दरवाढीमुळे नागरिकांकडून सरकारने तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

# पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज रद्द करा

## सर्वसामान्यांना दिलासा मिळावा म्हणून जयंत पाटलांचे मुख्यमंत्र्यांना पत्र




मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- देशभरात सातत्याने वाढत असलेल्या इंधनाच्या दरांनी सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून, आता या मुद्द्यावरून विरोधक आक्रमक झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि आमदार जयंत पाटील यांनी इंधन दरवाढीवरून सत्ताधारी महायुती सरकारवर हल्लाबोल केला आहे. राज्य सरकारने पेट्रोल आणि डिझेलवर आकारला जाणारा व्हॅट आणि सरचार्ज रद्द केल्यास इंधनाचे दर लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले असून, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रही लिहिले आहे.

जयंत पाटील यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे आपल्या पत्रातील मागण्या अधोरेखित केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, राज्य सरकारने इंधनावरील कर आणि अतिरिक्त अधिभार (सरचार्ज) रद्द केल्यास पेट्रोल-डिझेलचे दर लक्षणीयरीत्या कमी होतील. याचा सकारात्मक परिणाम केवळ वाहनधारकांवरच नाही, तर वाहतूक व्यवस्था, शेतीची कामे आणि उद्योग क्षेत्रावरही होईल. सध्याच्या कठीण आर्थिक परिस्थितीत जनतेच्या हिताचा विचार करून शासनाने हे कठोर पाऊल उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, "आखाती देशातील युद्धामुळे महाराष्ट्रासह देशाच्या आर्थिक परिस्थितीवर प्रचंड ताण येत आहे. महागाई प्रचंड वाढली आहे. खाद्य तेल, भाजीपाला, जीवनावश्यक वस्तूंच्या दरात मोठी वाढ झाली आहे. याचा फटका थेट सामान्य माणसाला बसत आहे. त्यात भरीस भर पेट्रोल डिझेलचे वाढणारे दर घालत आहेत. केंद्र सरकारकडून वारंवार पेट्रोल (पान ४ वर)

# नक्षलवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

## गडचिरोली-छत्तीसगड सीमेवर शस्त्रसाठ्यासह स्फोटके जप्त



गडचिरोली दि.२८ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील नक्षलवादी चळवळीचा कणा मोडून काढण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेत गडचिरोली पोलिसांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. महाराष्ट्र-छत्तीसगड सीमावर्ती दुर्गम जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी उभारलेला शस्त्रनिर्मिती कारखाना पोलिसांनी उद्ध्वस्त केला असून, मोठ्या प्रमाणावर शस्त्रे, स्फोटके आणि (पान ४ वर)

## प्रसिद्ध शायर बशीर बद्र यांचे निधन

भोपाळ दि.२८ (वृत्तसंस्था)- प्रख्यात शायर डॉ. बशीर बद्र यांचे गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भोपाळ येथे निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बद्र हे गेल्या बऱ्याच काळापासून 'डिमेंशिया' (स्मृतिभ्रंश) या आजाराने ग्रस्त होते. त्यांची स्मरणशक्ती पूर्णपणे लयाला गेली होती आणि त्यांना लोकांना ओळखणेही अशक्य झाले होते. गेल्या काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती सातत्याने खालावत होती. जेव्हा कधी त्यांना एखाद्या 'मुशायऱ्याची' (काव्यसंमेलनाची) आठवण करून दिली जाई, तेव्हा ते 'इर्शाद! इर्शाद!' असे म्हणायचे. बद्र यांनी उर्दू 'गझल'ला एक नवा सूर दिला;

# सिद्धारामय्या यांचा कर्नाटकच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

## मी माझा शब्द पाळला; राजीनामा देताना सिद्धरामय्या भावुक

बंगळुरू दि.२८ (वृत्तसंस्था)- गेल्या काही दिवसांपासून कर्नाटकमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी सुरू होत्या. मुख्यमंत्री पदावरून काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचंही बोललं जात होतं. या घडामोडीनंतर अखेर आज कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला असून आता डी.के.शिवकुमार यांची कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदी वर्णी लागणार असल्याची चर्चा आहे.

सिद्धरामय्या यांनी गुरुवारी (२८ मे) सकाळी एक महत्त्वपूर्ण 'ब्रेकफास्ट मीटिंग' आयोजित केली होती. त्या मीटिंगमध्येच सिद्धरामय्या यांनी मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसमोर राजीनामा देण्याची घोषणा केली होती. यावेळी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के.शिवकुमार हे देखील उपस्थित होते. या घोषणेनुसार, आज दुपारी सिद्धरामय्या यांनी लोकभवनमध्ये दाखल होत मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे.

कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत हे लोकभवनमध्ये उपस्थित नसल्यामुळे सिद्धरामय्या यांनी राज्यपालांचे सचिव प्रभू शंकर यांच्याकडे आपला राजीनामा सोपवला आहे. राजीनामा दिल्यानंतर सिद्धरामय्या यांनी पत्रकार परिषद घेत सविस्तर भाष्य केलं. 'मी माझा शब्द पाळला आहे', असं सांगत आपण राष्ट्रीय राजकारणात जाण्यास इच्छुक नसल्याचंही सिद्धरामय्या यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे काँग्रेसची राज्यसभेची ऑफर सिद्धरामय्या यांनी नाकारली असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

"काँग्रेस पक्षाच्या हायकमांडने मला राजीनामा देण्यास सांगितलं, त्यानुसार मी आज माझा राजीनामा सादर केला आहे. मला खात्री आहे की जेव्हा राज्यपाल लोकभवनमध्ये येतील, तेव्हा ते राजीनामा स्वीकारतील. कारण संविधानानुसार हे करणं आवश्यक आहे. आमच्याकडे पूर्ण बहुमत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना (सरकार स्थापन करण्याची) परवानगी देणं घटनात्मक आहे. तसेच मला मुख्यमंत्री पदाची संधी दिल्याबद्दल सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचं मी मनःपूर्वक आभार मानतो", असं सिद्धरामय्या यांनी म्हटलं आहे.

"आम्ही जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यासाठी काम (पान ४ वर)

## मुख्यमंत्र्यांवर टीका करून जरांगे पाटील स्वतःचा जनाधार कमी करत आहेत-राधाकृष्ण विखे

राहाता दि.२८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक आहेत. मुख्यमंत्र्यांवर टीका करून मनोज जरांगे आपला स्वतःचा जनाधार कमी करत आहेत, असा पलटवार मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केला आहे. मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारकडून सकारात्मक कार्यवाही सुरू आहे. उद्या, शुक्रवारी जरांगे पाटलांची भेट घेऊन त्यांना उपोषण स्थगित करण्याची विनंती करणार असल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले.

लोणी येथे आज, गुरूवारी माध्यमांशी बोलताना विखे म्हणाले, मुख्यमंत्री मागण्यांवर अतिशय सकारात्मक असताना फक्त त्यांनाच केंद्रबिंदू करून वैयक्तिक टीका करणे योग्य नाही. एका व्यक्तीवर टीका करून प्रश्न सुटणार नाही. जरांगे पाटलांच्या लढ्याबद्दल आदरच आहे. परंतु, मुख्यमंत्र्यांवर टीका करून ते आपला स्वतःचा जनाधार कमी करत आहेत. मराठा समाजाला यापूर्वी दिलेल्या आरक्षणाचे सर्व श्रेय देवेंद्र फडणवीस यांचेच आहे. त्यामुळे जरांगे पाटलांचे जे काही गैरसमज झाले आहेत, ते प्रत्यक्ष (पान ४ वर)

## 'उडवून टाकू', इराण युद्धानंतर डोनाल्ड ट्रम्प यांची आता 'ओमान'ला थेट धमकी

वॉशिंग्टन दि.२८ (वृत्तसंस्था)- इराण युद्धाला आज तीन महिने पूर्ण होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून इराण युद्धातून तोडगा काढण्यासाठी शस्त्रसंधी लागू असून युद्ध थांबविण्यासाठीची चर्चा सुरू आहे. मात्र ही चर्चा अत्यंत संथगतीने सुरू असल्यामुळे आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चांगलेच संतापले आहेत. त्यांनी आक्रमक भाषा वापरण्यास सुरुवात केली असून थेट आपला मित्र देश असलेल्या ओमानला धमकी दिली आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीवर कुणीही नियंत्रण ठेवू शकत नाही. मस्कटलाही (ओमानची राजधानी) तो अधिकार नाही, असे सांगून ट्रम्प यांनी मंत्रिमंडळ बैठकीत संताप व्यक्त केला. इराण आणि ओमान हे युद्ध समाप्तीनंतर होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवतील, हा प्रस्ताव ट्रम्प यांनी धुडकावून लावला.

"होर्मुझवर कुणीही नियंत्रण ठेवू शकत नाही. हा आंतरराष्ट्रीय जलमार्ग आहे. ओमाननेही इतर देशांप्रमाणेच वागायला हवे. अन्यथा आम्ही त्यांना उडवून टाकू", असा इशारा ट्रम्प यांनी दिला. ट्रम्प यांच्या या ताज्या विधानामुळे अनेकांना धक्का बसला आहे. कारण ओमान हा देश गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकेचा जुना आणि विश्वासू सहकारी मानला जात होता. ओमानमध्ये अमेरिकेच्या लष्करी सहकार्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच अमेरिका आणि इराणमध्ये मध्यस्थी म्हणूनही ओमान भूमिका बजावत होता.

अमेरिका-इस्रायल यांचे इराणविरोधातील युद्ध समाप्त करण्यासाठी होर्मुझची सामुद्रधुनी महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरत आहे. वर्षाच्या सुरुवातीला पश्चिम आशियातील युद्ध सुरू होण्यापूर्वी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगाला मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा होत होता.

## नीट पेपरफुटी रोखण्यासाठी वायूदलाच्या विमानांनी पोहोचवणार पेपर

नवी दिल्ली दि.२८ (वृत्तसंस्था)- देशभरात सातत्याने गाजत असलेल्या वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेतील घोटाळे आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता पूर्णपणे अ‍ॅक्शन मोडमध्ये आलं आहे. आगामी २१ जून रोजी होणारी नीटची फेरपरीक्षा अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि योग्य रीतीने पार पाडण्यासाठी सरकारनं थेट भारतीय लष्कराची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. इतकंच नव्हे, तर देशातील सर्व परीक्षा केंद्रांवर गोपनीय पेपर्स सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी भारतीय वायूदलाची मदत घेतली जाणार आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ही माहिती दिली.

नीटच्या फेरपरीक्षेच्या नियोजनासंदर्भात आज देशाची राजधानी दिल्लीमध्ये एक अत्यंत उच्चस्तरीय आणि महत्त्वाची बैठक पार पडली. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अधिकृत निवासस्थानी ही बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, सीबीएसईचे वरिष्ठ अधिकारी आणि पंतप्रधान कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत २१ जून रोजी होणाऱ्या फेरपरीक्षेच्या संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संवाद साधताना या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली. परीक्षेतील वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी आणि देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. या बैठकीत नीट परीक्षा अधिक पारदर्शक आणि फुलप्रूफ करण्याबाबत विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. परीक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक सुधारणा केल्या जाणार असून, संवेदनशील परीक्षा केंद्रांवर कडक पहारा ठेवण्यात येणार आहे. पेपर लीकचा कोणताही मार्ग उरणार नाही, अशा प्रकारे तांत्रिक आणि मानवी सुरक्षा यंत्रणा तैनात केली जाईल. पेपर वाहतुकी दरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठीच वायूदलाच्या विशेष विमानांची मदत घेतली जाणार आहे.

# राज्यात ईदचा उत्साह; मुस्लिम बांधवांकडून शांतता, समृद्धीसाठी प्रार्थना

## एकादशीचा आदर राखत पंढरपुरात कुर्बानी टाळली

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- राज्यभरात आज बकरी ईद अर्थात ईद-उल-अधा मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. मुंबई, सोलापूर, नाशिक, भुसावळसह अनेक शहरांमध्ये मुस्लिम बांधवांनी सकाळी सामूहिक नमाज पठण करत शांतता, बंधुभाव आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली. यंदा विशेष म्हणजे बकरी ईद आणि एकादशी एकाच दिवशी आल्यामुळे अनेक ठिकाणी सामाजिक सलोखा आणि परस्पर आदराचे चित्र पाहायला मिळाले. हिंदू आणि मुस्लिम समाजाने एकमेकांना सणाच्या शुभेच्छा देत ऐक्याचा संदेश दिला.

मुंबईतील विविध मशिदी आणि ईदगाह मैदानांमध्ये सकाळपासूनच मोठी गर्दी पाहायला मिळाली. पोलिसांकडून सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली होती. नाशिकमध्येही ईदगाह मैदानावर मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव एकत्र आले होते. सुरक्षेच्या कारणास्तव प्रवेशद्वारांवर तपासणी करण्यात आली. पिशव्या आणि साहित्याची कसून पाहणी केल्यानंतरच नागरिकांना मैदानात प्रवेश देण्यात आला. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली होती.

भुसावळ शहरातील नवीन ईदगाह मैदानावर सकाळी सुमारे ८:३० वाजता ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली. नमाज पठणानंतर मुस्लिम समाजबांधवांनी देशात शांतता, जातीय सलोखा आणि एकात्मता कायम राहावी, अशी प्रार्थना केली. यासोबतच राज्यात आणि देशात चांगला पाऊस पडावा, (पान ४ वर)

## राज्याच्या विकासकामासाठी दिल्लीत आलो; अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर बैठका झाल्या-एकनाथ शिंदे



मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गेल्या दोन दिवसांपासून दिल्ली दौऱ्यावर आहेत. राज्यातील तिन्ही मुख्य नेते दिल्लीत एकाचवेळी असल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीत असलेल्या शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'राजकीय बैठकीसाठी मी दिल्लीत आलो नव्हतो. राज्याच्या विकासकामासाठी आलो होतो.'

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'आम्ही दोन दिवसांपासून दिल्लीत आहोत, त्याबाबत एवढा प्रश्न का पडला आहे? राज्यातील जनतेसाठी आणि महत्त्वाच्या योजनांसाठी केंद्राकडे भूमिका मांडणे हे आमचे कर्तव्यच आहे. (पान ४ वर)

# कांद्याला दीड नाही ३ हजार रुपयेच भाव द्या, हर्षवर्धन सपकाळांची मागणी



मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भरतेचे गाजर दाखवून अर्थव्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्यानेच इंधन संकट ओढवले आहे. कोणतेही ठोस धोरण नसल्याने पेट्रोल, डिझेल, सीएनजी, एलपीजी गॅसची मोठ्या प्रमाणात भाववाढ करावी लागत आहे. इंधन कमतरता होणार हे दिसत असतानाही नरेंद्र मोदी पाच राज्याच्या निवडणूक प्रचारात व्यस्त होते, त्याची मोठी किंमत देशातील जनतेला मोजावी लागत आहे. इंधन दरवाढ व टंचाई हे नरेंद्र मोदी यांचेच पाप आहे, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, २०१४ साली सत्तेत आल्यापासूनच मोदी सरकारने इंधनाचे भाव सातत्याने वाढवले आहेत. यातून सरकारी तेल कंपन्या व रिलायन्स तसेच नायरा या खाजगी तेल कंपन्यांनी भरमसाठ नफा कमावला आहे. मोदी सरकारने तेलासाठी रिझर्व्ह फंड तयार केला असता तर ही वेळ आली नसती पण कंपन्यांचे हित लक्षात घेतले, हा मोठा भ्रष्टाचारच आहे. इंधन व गॅस चंटाईचा मोठा फटका हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, छोटे उद्योगधंदे व घरातील स्वयंपाकालाही बसला आहे. नरेंद्र मोदी यांच्या चुकीच्या धोरणामुळेच अर्थव्यवस्था कोलमडली आहे, असेही सपकाळ (पान ४ वर)

# खादी ग्रामोद्योगाची सुवर्ण कामगिरी

भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणाऱ्या खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्पादन, विक्री आणि रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. व्होकल फॉर लोकल, लोकल टू ग्लोबल आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनांच्या माध्यमातून ग्रामीण उद्योगांना मोठी चालना मिळाली आहे. खादी ग्रामोद्योगाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांची विक्री पहिल्यांदाच १.८७ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. ही केवळ आर्थिक प्रगती नसून ग्रामीण भारताच्या बदलत्या सामर्थ्याची साक्ष मानली जात आहे.

नवी दिल्लीतील गांधी दर्शन येथे आयोजित कार्यक्रमात ही आकडेवारी सादर करण्यात आलीवेळी अध्यक्ष मनोज कुमार यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्राने गेल्या १२ वर्षांत अभूतपूर्व वाढ अनुभवली आहे. २०१३-१४ च्या तुलनेत विक्रीत ५०१ टक्के, उत्पादनात ३८० टक्के आणि रोजगार निर्मितीत ५६ टक्के वाढ झाली आहे. या यशामागे ग्रामीण भागातील लाखो कारागीर, महिला स्वयंरोजगार गट आणि लघुउद्योजकांचे कठोर परिश्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. २०१३-१४ या आर्थिक वर्षात खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्राचे उत्पादन २६,१०९ कोटी रुपये होते. २०२५-२६ मध्ये हे उत्पादन १,२५,२९६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले. म्हणजेच उत्पादनात जवळपास पाचपट वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे विक्रीतही मोठी झेप दिसून आली. २०१३-१४ मध्ये ३१,१५४ कोटी रुपयांची असलेली विक्री २०२५-२६ मध्ये वाढून १,८७,१०५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. ही वाढ केवळ आकडेवारीतील बदल नाही, तर ग्रामीण भारताच्या आर्थिक स्वावलंबनाची नवी ओळख आहे. गावागावातील लघुउद्योग, पारंपरिक हस्तकला, मधमाशी पालन, अगरबत्ती उद्योग, खादी वस्त्रनिर्मिती, कागदी वस्तू उत्पादन आणि अन्य अनेक ग्रामीण उद्योग आता राष्ट्रीय बाजारपेठेत आपले मजबूत स्थान निर्माण करत आहेत.

खादी हे एकेकाळी केवळ स्वातंत्र्य चळवळीचे प्रतीक मानले जात होते. मात्र, आज खादी आधुनिक फॅशन आणि जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग बनत आहे. २०१३-१४ मध्ये खादी कपड्यांचे उत्पादन ८११ कोटी रुपये होते. ते २०२५-२६ मध्ये ३,९७४ कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. विक्रीतही मोठी झेप घेत १,०८१ कोटी रुपयांवरून ७,८६९ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये खादीचा सातत्याने प्रचार केला. 'मन की बात'सारख्या कार्यक्रमांतून खादी वापरण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून युवक, नोकरदार वर्ग आणि शहरी ग्राहकांमध्ये खादीबद्दल आकर्षण वाढले. आज अनेक फॅशन डिझायनर्स आणि ब्रँड्स खादीचा वापर करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विणकर आणि कारागिरांना मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

ग्रामीण उद्योग क्षेत्रानेही उल्लेखनीय प्रगती साधली आहे. २०१३-१४ मध्ये ग्रामीण उद्योग उत्पादनांचे मूल्य २५,२९८ कोटी रुपये होते. ते आता वाढून १,२१,३२२ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. 'घर घर स्वदेशी' आणि 'व्होकल फॉर लोकल' या मोहिमंमुळे भारतीय उत्पादनांना ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळू लागला आहे. खादी ग्रामोद्योगाची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे रोजगार निर्मिती. २०१३-१४ मध्ये खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्रात सुमारे १.३० कोटी लोकांना रोजगार उपलब्ध होता. २०२५-२६ मध्ये ही संख्या वाढून २.०४ कोटींवर पोहोचली आहे. म्हणजेच ५६ टक्के वाढ नोंदली गेली आहे. ग्रामीण उद्योग क्षेत्रात स्वतंत्रपणे पाहिले तर रोजगाराचा आकडा १.१९ कोटींवरून जवळपास १.९९ कोटींवर पोहोचला आहे. गावातच रोजगार उपलब्ध झाल्याने शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत होत आहे. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना ग्रामीण उद्योजकांसाठी आधार ठरली आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेअंतर्गत ६६,४९४ नवीन उद्योग युनिट्सची स्थापना करण्यात आली. या उद्योगांसाठी ७,३७५ कोटी रुपयांच्या कर्जावर २,४५७ कोटी रुपयांची सबसिडी देण्यात आली. या माध्यमातून ७.३१ लाख लोकांना रोजगार मिळाला. योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंत १०.८४ लाखांहून अधिक उद्योग सुरू झाले असून जवळपास ९८ लाख नागरिकांना रोजगार मिळाला आहे. खादी ग्रामोद्योगाच्या उपक्रमांमुळे महिला सक्षमीकरणालाही चालना मिळाली आहे. २०२५-२६ मध्ये खादी ग्रामोद्योगाच्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये ७९,६८२ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. त्यापैकी ४७,३८२ महिला होत्या.

पंतप्रधान रोजगार निर्मिती अंतर्गत २८,१८० महिला उद्योजकांनी नवीन उद्योग सुरू केले, ज्यामुळे ३ लाखांहून अधिक महिलांना रोजगार मिळाला. खादी क्षेत्रात ८० टक्के कारागीर महिला आहेत. २०१३-१४ मध्ये कारागिरांना मिळणारे मानधन ४ रुपये प्रति लाख होते. ते आता वाढून १५ रुपये प्रति लाख झाले आहे. म्हणजेच सुमारे २७५ टक्के वाढ झाली आहे. यामुळे ग्रामीण भागातील कारागिरांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे. 'हर घर तिरंगा' मोहिमचाही परिणाम खादी क्षेत्रावर दिसून आला आहे. राष्ट्रध्वजांच्या विक्रीत मोठी वाढ झाली असून, २०१३-१४ मधील ०.८७ कोटी रुपयांवरून २०२५-२६ मध्ये ती २.३५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. यामुळे खादीबद्दलची राष्ट्रीय भावना आणि जनसहभाग अधिक मजबूत झाल्याचे दिसते. खादी ग्रामोद्योगामुळे रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण, स्वदेशी उद्योगांना चालना आणि ग्रामीण उद्योजकतेचा विस्तार यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला आधार मिळत आहे. विकसित भारत २०४७ या संकल्पनेकडे वाटचाल करताना खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्र भविष्यात मोठी भूमिका बजावणार आहे.

# वादळाचं थैमान : जीवांची दाणादाण!

**माणसाच्या उपद्र्यापाला निसर्ग आता पूरता कंटाळला आहे. जगाच्या पाठीवर माणसाचे पाप भारी झाले. त्यामुळे निसर्ग आदमुसून गेला आणि तो आता खडबडून मोकळा श्वास घेऊ पाहातोय. माणसाने चालवलेले उपद्रव त्याला नकोसे वाटू लागले आहेत. म्हणून तो कड फेरत- कुस बदलत आहे, असे ग्रामीण बुजूर्ग लोक चावडीवर एकत्र बसून चर्चा करताना दिसत आहेत. नैसर्गिक आपदांवर भाष्य करणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख अभ्यासा... संपादक.**



चक्रीवादळ हे एक प्रकारचे विध्वंसक वादळ आहे. हे समुद्रात एका कमी दाबाच्या प्रदेशाभोवती गोलगोल फिरणाऱ्या हवेमुळे बनते. हिंदी महासागरात होणाऱ्या चक्रीवादळाला इंग्लिश भाषेत सायक्लॉन, अटलांटिकमध्ये होणाऱ्याला हरिकेन आणि पॅसिफिक महासागरातील चक्रीवादळाला टायफून या नावाने ओळखले जाते. सर्वसाधारणपणे चक्रीवादळाचा पुढे सरकण्याचा वेग ताशी २० किलोमीटरपेक्षा बराच कमी असतो. चक्रीवादळाची तीव्रता या प्रकारांनी मोजण्यात येते- वातावरणशास्त्र- क्लायमॅटॉलॉजी, सामान्य सरासरीचे अवलोकन, उपग्रहाची मदत घेऊन, रडार वापरून. चक्रीवादळाचे नामकरण-

सध्या चक्रीवादळाला नाव देण्याची पद्धत आहे. हवामानतज्ज्ञ व त्याविषयी काम करणाऱ्या सर्वांना संवाद करण्यास सोपे जावे, म्हणून त्याचे नामकरण करतात. या पद्धतीचे जनक ऑस्ट्रेलियातील हवामानतज्ज्ञ आहेत. ते आपल्याला न आवडणाऱ्या राजकारणी लोकांचे नाव देत असत. अमेरिकन सैनिक आपल्या पत्नीचे किंवा मैत्रिणीचे नाव देत असत. १९७९मध्ये जागतिक हवामान संघटनेने स्त्री पुरुषांची प्रचलित नावे देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यासाठी एक यादीच बनविली होती. सन २०००पासून एका वेगळ्या पद्धतीने नावे देण्यात येतात. निसर्गाशी संबंधीत, खाद्यपदार्थांची ती नावे आहेत. जेथे चक्रीवादळे येतात, त्या देशांची यादीही तयार करण्यात आलेली आहे. साधारणतः सहा वर्षांनी या यादीतील नावे वापरणे प्रथमपासून सुरू करतात.

माणसाच्या उपद्र्यापाला निसर्ग आता पूरता कंटाळला आहे. जगाच्या पाठीवर माणसाचे पाप भारी झाले. त्यामुळे निसर्ग आदमुसून गेला आणि तो आता खडबडून मोकळा श्वास घेऊ पाहातोय. माणसाने चालवलेले उपद्रव त्याला नकोसे वाटू लागले आहेत. म्हणून तो कड फेरत- कुस बदलत आहे, असे ग्रामीण बुजूर्ग लोक चावडीवर एकत्र बसून चर्चा करताना दिसत आहेत. कारण यंदा जगभरातच उष्णतेने उच्चांक गाठलेला असल्याच्या बातम्या पेपरात धडकत आहेत. मागील आठवड्यात मेक्सिको देशात उष्माघाताच्या तडाख्याने कहरच केला म्हणे. झाडावर बसलेली माकडे पाडाची आंबे पडावी तशी एकापाठोपाठ एक खाली मरून पडली. बऱ्याच ठिकाणी माणसंसुद्धा उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे दगावल्याचे ऐकिवात आहे. गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात तर रानटी श्वापदांचा धुडगूस- धुमाकूळ सुरूच आहे, तो कायम बंद होण्याचं नावच घेत नाही. वाघ, सिंह, अस्वल, कोल्हे मानवमात्राच्या रक्ताचे घोट घेऊन जीवितहानी करताहेत. तर महाकाय हत्तींचा कळप शेतशिवार आणि घरेदारे तुडवून धूळधाण करत ते मातीमोल करताहेत. राखणीविना शेतातील उभ्या पिकांची नासाडी झालेले दृश्य उघड्या डोळ्यांनी निमूटपणे बघावे लागते, त्यांना हाकलण्यास जावे तर ते माणसावर चवताळून येतात. माणसाला आदळून, आपटून आणि कुचलून ठार मारतात. हे शेतकऱ्यांचे किती म्हणावे दुर्दैव!

असह्य उष्णतेने बेजार माणूस पहाटेच्या मंद मंद गार हवेने साखरझोपेत असताना भूस्खलनाच्या एका नव्याच संकटाट सापडतो. काही हाक ना बोंब करताच तो कायमचा झोपतो आणि सोयऱ्या- धायऱ्याविणाच त्याची मूठमाती होते. असेच एका देशातील टेकडीच्या पायथ्याच्या वसलेल्या खेड्यात घडले आहे. पहाटे लोक गाढ झोपलेले असतांना टेकडी गावावर कोसळली आणि शेकडो जण दबून मृत्यूमुखी पडली तर बाकी सारे जखमी होऊन उपचार घेत आहेत. तर गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, अमरावती आदी विदर्भातील जिल्ह्यांना चक्रीवादळाच्या तांडवाचा आणि अवकाळी पावसाचा चांगलाच फटका बसला आहे. घरदार, पीक यांची अतोनात हानी झाली आहे. जनजीवनात विस्कळीत झाले. निसर्गाच्या अनिश्चिततेसमोर मानवी सामर्थ्य कधीच टिकाव धरू शकत नाही. अशातच महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांवर चक्रीवादळाची सावली पसरली आहे. यामुळे नागरिकांच्या जीवनावर परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. गेल्या आठवड्याभरापासून राज्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाने अक्षरक्षः झोडपून काढलं आहे. राज्यात एकीकडे तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असताना विदर्भात सलग आठवडाभर पावसाची हजेरी लागताना दिसत आहे. पुढील तीन दिवसही विदर्भातील सर्व जिल्ह्यांना हवामान विभागाकडून अवकाळी पाऊस, विजांच्या कडकडासह ३०-४० किमी प्रति तास सोसाट्याच्या वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. जोरदार पावसामुळे केवळ शेतकरी समाजालाच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांना देखील मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. महाराष्ट्रात सुरू असलेल्या अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. पावसाची तीव्रता वाढत असून, पुढील काही दिवस राज्यावर मुसळधार पावसाची सावली पसरण्याची शक्यता आहे. म्हणूनच बऱ्याच लोकांच्या ओठांतून किंचाळी उमटत आहे, 'अरंऽऽऽ... देवा! तुझ्या मनात हाय तरी कायरं? काय होईल कोण जाणे?'

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असून 'एल निनो' चक्रीवादळाची निर्मिती होत आहे. या चक्रीवादळामुळे देशभरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे ओडिशा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांच्या किनारपट्टी प्रदेशांत मोठ्या हवामान बदलाची शक्यता आहे. ताशी ७० किलोमीटर वेगाने हे वादळ किनारपट्टी प्रदेशांना धडकणार असल्याने, या भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाल्यास, येत्या दोन ते तीन दिवसांत या वादळाचा काही प्रमाणात परिणाम राज्यावर होण्याची शक्यता आहे. कमी दाबाच्या पट्ट्यामुळे मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या काळात राज्यात ५० ते ६० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात, असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. दोन दिवसांपासून कोकणात मुसळधार पाऊस सुरू आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वादळासह झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असून, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. चक्रीवादळासह पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे शेतकरी बांधवांवर मोठे संकट कोसळले आहे. पिकांच्या नुकसानीबरोबरच घरेदेखील उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे पिके भुईसपाट झाली असून त्यांच्यासमोर उपासमारीची वेळ आली आहे. राज्यातील विविध ठिकाणी नदी-नाल्यांना पूर आला असून, अनेक गावे वाहून गेली आहेत. नागरिकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. शासनाने बचाव कार्य हाती घेतले असून, विविध भागांतून नागरिकांची सुरक्षित सुटका करण्यात येत आहे. शासनाने सर्वतोपरी नागरीकांना मदत करावी, असे सुचवावेसे वाटते. !! नागरिकानो, सावधान! स्वतःची काळजी स्वतः घ्या आणि दक्ष वागा !!

- एक शेतकरीपुत्र -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(दिनविशेषकार)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली,
जि. गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

# प्रबळ महत्वाकांक्षी बना

**मनुष्याच्या** जीवनात प्रगती, यश आणि समाधान मिळवण्यासाठी महत्त्वाकांक्षा असणे आवश्यक आहे. महत्त्वाकांक्षा म्हणजे आयुष्यात काहीतरी मोठे, चांगले आणि अर्थपूर्ण करण्याची इच्छा. ज्याच्या मनात मोठी स्वप्ने आणि ती पूर्ण करण्याची जिद्द असते, तीच व्यक्ती आयुष्यात यशाच्या शिखरावर पोहोचते. म्हणूनच प्रत्येकाने प्रबळ महत्त्वाकांक्षी बनणे गरजेचे आहे.

प्रबळ महत्त्वाकांक्षा म्हणजे फक्त मोठी स्वप्ने पाहणे नव्हे, तर ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने मेहनत घेणे होय. अनेक लोक स्वप्ने पाहतात; परंतु स्वप्न पूर्ण करण्यासाठी चिकाटी, संयम आणि कठोर परिश्रम यांची जोड आवश्यक असते. महत्त्वाकांक्षा जर योग्य दिशेने असेल, तर ती माणसाला उंच भरारी घेण्यास मदत करते.

विद्यार्थ्यांच्या जीवनात तर महत्त्वाकांक्षेला विशेष महत्त्व आहे. मला डॉक्टर व्हायचे आहे, मला शिक्षक बनायचे आहे, मला अधिकारी व्हायचे आहे - ही फक्त इच्छा नसून ती महत्त्वाकांक्षा आहे; परंतु केवळ बोलून उपयोग नाही; त्यासाठी अभ्यास, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असतात. आपल्या इतिहासात आणि समाजात अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी प्रबळ महत्त्वाकांक्षेच्या जोरावर यश मिळवले.

उदाहरणार्थ, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जीवन पाहिले तर ते लहानपणी अतिशय साध्या परिस्थितीत वाढले. वर्तमानपत्रे विकण्याचे काम करत असतानाही त्यांनी मोठी स्वप्ने पाहिली. त्यांच्या मनात देशासाठी काहीतरी मोठे करण्याची महत्त्वाकांक्षा होती. कठोर परिश्रम, शिक्षण आणि चिकाटी यांच्या जोरावर ते देशाचे महान शास्त्रज्ञ आणि राष्ट्रपती बनले. त्यांच्या यशामागे प्रबळ महत्त्वाकांक्षा आणि अथक प्रयत्न होते.

तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडे स्वराज्य स्थापनेची महान महत्त्वाकांक्षा होती. अनेक संकटे आणि अडचणी असूनही त्यांनी आपले ध्येय सोडले नाही. त्यांची जिद्द आणि दृढ निश्चय आजही प्रेरणादायी आहे.महत्त्वाकांक्षा ही सकारात्मक असावी. दुसऱ्यांना मागे टाकण्यापेक्षा स्वतःची प्रगती करण्याची भावना महत्त्वाची आहे. चुकीच्या मार्गाने मिळालेले यश टिकत नाही; परंतु प्रामाणिक प्रयत्नातून मिळालेले यश कायम आनंद देणारे असते.

शेवटी, प्रत्येकाने स्वतःसाठी मोठी स्वप्ने पाहावीत, ध्येय निश्चित करावे आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत. कारण प्रबळ महत्त्वाकांक्षा ही यशाची पहिली पायरी आहे.

मोठी स्वप्ने पाहा, त्यासाठी मेहनत करा आणि स्वतःचे भविष्य उज्ज्वल बनवा.ङ्क शिवरायांचे आठवावे रूप। शिवरायांचा आठवावा साक्षेप। शिवरायांचा आठवावा प्रताप। भूमंडळी।। एका कवींने म्हटले आहे - ङ्गथोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पाहा जरा. आपण त्यांच्यासमान व्हावे हाची सापडे बोध खरा.ङ्क आपण आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित केले पाहिजे. त्या ध्येयाला अनुकूल असे व्यक्तिमत्त्व आपल्या डोळ्यांसमोर आदर्श म्हणून ठेवले पाहिजे. समर्थ रामदासांनी असा एक गुणपुरुष आपणा सर्वांच्या समोर आदर्श म्हणून ठेवला आहे. तो महापुरुष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी छत्तीस वर्षे अखंड प्रयत्न केले. या त्यांच्या प्रयत्नांना समर्थ साक्षेप असे म्हणतात. शिवाजी महाराजांचे साहस, पराक्रम, गुणग्राहकता, माणसांची पारख, विनम्रता, धर्मनिष्ठा हे सद्गुण सतत आठवून आपण आत्मसात करायला हवेत.

मूठभर मावळ्यांच्या मदतीने शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्याचा उद्योग सुरू केला. सुमारे पस्तीस हजार फौज आणि प्रचंड दारूगोळा घेऊन आलेल्या अफजलखानाची अवघ्या दहा हजार सैन्याच्या मदतीने शिवाजी महाराज लढले व त्यांनी खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. खुद्द अफजलखान मारला गेला. लाल महालातील शिवाजी महाराजांच्या राहत्या घरात शाईस्तेखान उतरला होता. लाल महालातील पवित्र वास्तूत त्याने नाचगाणी आणि तमाशे यांचा थैमान चालवला होता. अशा वेळी महाराज फक्त चारशे स्वारांनिशी लाल महालात शिरले व शाईस्तेखानाची बोटे कापून पसार झाले.

त्यावेळी लाल महालाच्या भोवती शाईस्तेखानाची एक लाख तीस हजार फौज होती. पण सर्वांच्या हातावर तुरी देऊन महाराज सिंहगडावर पळून गेले. उजव्या हाताची बोटे तुटल्यामुळे जेवायला बसताना खानाला रोज शिवाजी महाराजांची आठवण होत असे.

औरंगजेबाने शिवाजी महाराजांना कैद केले तेव्हा दोन हजार माणसांचा पहारा त्यांच्याभोवती ठेवला होता.


पण ज्याप्रमाणे तुरुंगात जन्मलेले श्रीकृष्ण तुरुंगातून जन्मतःच पसार झाले त्याप्रमाणे मोठ्या युक्तीने महाराज आग्र्याहून निसटले व राजगडावर सुखरूप पोहोचले. मुलगा परत आल्याचे पाहून जिजाबाईना अतिशय आनंद झाला.

शिवाजी महाराजांनी तहाच्या वेळी औरंगजेबाला दिलेले तेवीस किल्ले पुन्हा जिंकून घेतले. आपल्या मनात विजयी होण्याची प्रबळ महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. त्यासाठी शिवचरित्राचे स्मरण हवे.

## आनंदलहरी भाग-१५४

**निंदी कोणी मारी ।। वंदी कोणी पूजा करी ।।**

निंदा हा समाजाला लागलेला एक प्रकारचा रोग आहे. हा रोग समाजाच्या प्रगतीत अडसर ठरत असतो. वाद-विवादाला तोंड फोडण्याचे कामही निंदेकडून घडते. निंदा करणाऱ्याला क्षणिक आनंद मिळत असला तरी ज्याची निंदा केली जाते, त्याची मानसिकता ढवळून निघते. निंदेमुळे माणूस अस्थिर होतो. ही अस्थिरता यशाच्या वाटेवर अडथळा म्हणून उभी राहते. माणसाचे मानसिक खच्चीकरण निंदेमुळे होते. मानसिक खच्चीकरण झालेला माणूस आपल्या कर्तव्यात पाहिजे तेवढया वेगाने पुढे जाऊ शकत नाही. मानसिक खच्चीकरणामुळे माणसाचे शारीरिक व मानसिक नुकसान होते. हे नुकसान आर्थिक नुकसानीपेक्षा भयंकर असते. आर्थिक नुकसान कांही मार्ग शोधून भरुन



तरी काढता येते, पण मानसिक नुकसान भरुन काढणे अवघड असते. आपली कोणी निंदा केली किंवा कोणी लहानसा मानसिक धक्का जरी आपणाला दिला तरी आपण लगेच ढळतो, अस्थिर होतो. कोणी थोडासा मान-सन्मान केला किंवा साधारण महत्व दिले तर आपण आपली जागा सोडतो आणि लगेच आपल्या मनाने उच्चपद धारण करतो. आहे त्या परिस्थितीतून स्वतःला दुःखाने किंवा अहंभावाने एकदम खाली आणणे किंवा एकदम वर चढविणे हितकारक नसते. ही एक प्रकारची अस्थिरता असते. निंदा, मान अवमान, महत्व हे सर्व मनाचे खेळ आहेत. मानले तर खूप कांही आहे आणि नाही मानले तर कांहीही नाही. मानण्याने अस्थिरत्व प्राप्त होऊन वाट्याला दुःखच येणार असेल तर न मानलेलेच बरे. तुकाराम महाराजांच्या जीवनात अनेकवेळा लोकानी विविध प्रकारे खुप चढ-उतार केले. काहींनी मान दिला तर काहींनी अवमान केला, तर कांहींनी टिंगल केली, निंदा केली तर कांहींनी पूजा केली. महाराजानी या सर्व परिस्थितीत समाधान मानले.सर्व परिस्थितीकडे त्यानी सकारात्मक दृष्टीकानातून पाहिले. त्यांची ही सकारात्मक दृष्टी त्यांच्या स्थिरत्वाला पुष्टी देणारी ठरली. चढ-उतारास कारणीभूत होणाऱ्या परिस्थितीचा त्यांनी मनावर कांहीच परिणाम होऊ दिला नाही. त्यांनी आपल्या आुभवातून याबद्दल बोलताना म्हटले आहे की, 'निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ।। मज हें ही नाही तेंही नाही ।। वेगळा दोहींपासूनी ।।'

सुख-दुःख, चांगले-वाईट, निंदा-स्तुती, मान-अवमान अशा दोन टोके असणाऱ्या सर्व परिस्थितीला समान समजणे ही साधी बाब नाही. अशा सर्व परिस्थितीकडे समत्वाने पाहण्याची दृष्टी ज्याला लाभली तो संत महात्माच म्हणून ओळखला जातो. आपण संत, महात्मेच बनावेत असे कांही नाही. पण चढ-उतारात्मक परिस्थितीकडे समत्वाने पाहण्याची दृष्टी निर्माण करुन चांगला माणूस बनू शकलो तरी पुरेसे होणार आहे. दुसऱ्याच्या तोंडावर हात ठेवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वतःच्या कानावर हात ठेवण्याचा प्रयन्त केला तरी निंदेसारख्या शस्त्राचे घाव आपल्या मनावर उमटणार नाहीत. शरीरावरचे घाव बुझविता येतात पण मनावरचे घाव बुझविणे अवघड असते. म्हणून असे घाव आपल्या मनावर पडणारच नाहीत, अशीच आपली मानसिकता आपण बनवून घ्यावी. संत श्री ज्ञानोबा-तुकारामांच्या जीवनाकडे पाहून आपण अशी मानसिकता बनवून घेण्याचा प्रयन्त करु या. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड,**
**छत्रपती संभाजीनगर ९४२२२१६४४८**

# सावरकरांना कधीच एका व्यक्तीचा उदोउदो करणं मान्य नव्हतं - राज ठाकरे

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची आज (२८ मे २०२६ रोजी) १४३ वी जयंती आहे. सावरकरांच्या जयंतीच्या निमित्ताने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी वर एक पोस्ट शेअर करत महाराष्ट्रातील तसेच देशातील राजकीय व सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले आहे. यावेळी त्यांनी 'सावरकरांना कधीच एका व्यक्तीचा उदोउदो करणं मान्य नव्हतं', असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे. तसेच सध्या महाराष्ट्रात सावरकरांच्या प्रतिमा वापरून धर्मात तेढ पसरवणं सुरू आहे, अशी टीका देखील त्यांनी या पोस्टमधून केली आहे.

'सावरकर हे हिंदू राष्ट्रवाद मांडणारे तत्वज्ञ होते, क्रियाशील धर्मसुधारक, समाजसुधारक होते, आणि तितकेच विज्ञाननिष्ठ पण होते. सावरकर हे माझ्या मते देशातील एक असे महापुरुष आहेत, की त्यांच्या टीकाकारांना पूर्ण सावरकर कधी कळले नाहीत किंवा झेपले नाहीत आणि सध्या सावरकरांचा उदोउदो करून त्यातून मतांची बेगमी



करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी तरी सावरकर वाचले असतील का? त्यांना समजले असतील का याची शंकाच आहे. प्रत्येक गोष्ट आपल्या बुद्धीला पटते का हे पाहणारे सावरकर खरंच यांना झेपत असतील का ? असा सवाल त्यांनी पोस्ट मधून केला आहे. 'सावरकरांना कधीच एका व्यक्तीचा उदोउदो करणं मान्य नव्हतं. कुठलीही गोष्ट तर्क आणि विज्ञानाच्या कसोट्यांवर थोडक्यात सत्य असत्य स्वतः तपासून बघितलं पाहिजे असं त्यांचं ठाम मत होतं. हे सगळं सांगण्याचं कारण इतकंच ज्या भूमीत सावरकर जन्माला आले त्या महाराष्ट्रात व्हाट्सअप विद्यापीठात काय आलंय ते चूक बरोबर काही न तपासता किंवा साधा विचार पण न करता खरं मानण्याची चढाओढ लागली आहे. याच महाराष्ट्रात राजकारणी भोंदू बाबांच्या भजनी लागल्याचं दिसत आहे. आणि आपण कोण होतो, आपली महाराष्ट्राची परंपरा किती उज्वल होती हे न बघता उत्सव, डीजे याच्यात आपल्याला गुंतवून ठेवलं जात आहे. सावरकर हे प्रखर हिंदू धर्मभिमानी होते पण म्हणून धर्मातील त्रुटींवर टीका करताना त्यांनी कधी मागेपुढे पाहिलं नाही. पण आज सावरकरांच्या महाराष्ट्रात त्यांच्या प्रतिमा वापरून फक्त धर्मात तेढ पसरवणं सुरु आहे. जिथे त्यांनी जाती अंताचा लढा दिला त्या महाराष्ट्रात जातींवरून डोकी फोडणं सुरु आहे. आणि याला खतपाणी सत्ताधारी घालत आहेत', असे राज ठाकरे म्हणाले. 'उठता बसता सावकरकरांचा तिरस्कार करणाऱ्यांना सोडून द्या. पण जे त्यांचा वापर स्वतःच्या राजकारणासाठी करत आहेत त्यांना नक्की कुठले सावरकर कळलेत आणि त्यांचे कुठले विचार राजकीय आचरणात आणण्याची तयारी आहे? मी गेल्या २ महिन्यांत दोन वेळेस भाषणांमधून महाराष्ट्र विचारांनी आणि कल्पनांनी किती संपन्न आणि पुढारलेला होता हे सादरीकरण करून सांगतोय. याचं कारण आपण कोण होतो हेच आपण विसरलो तर पुढे कुठे जायचं याचा मार्ग आखणार तरी कसे आहोत? आणि यासाठी जर आपण सत्तेला आसुलेले राजकारणी आणि व्हाट्सअप विद्यापीठातील खोटी नरेटिव्ह यावर अवलंबून राहणार असू तर महाराष्ट्राचं कठीण आहे. आपण कोण होतो आणि आपल्या परंपरेतलं जे उत्तम आहे ते घेणं, प्रत्येक गोष्टीला तर्कावर तपासून बघणं हे करणं म्हणजेच सावरकरांना खरी श्रद्धांजली. अन्यथा तो उपचार ठरेल', असे राज ठाकरे म्हणाले.

# पिंपळे सौदागर येथे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात



पिंपळे सौदागर, दि. २८ (प्रतिनिधी) – जाज्वल्य देशाभिमानी, प्रखर राष्ट्रभक्त, थोर स्वातंत्र्य सैनिक, धडाडीचे क्रांतीकारक, उत्तुंग प्रतिभा लाभलेले लेखक आणि कवी अशा प्रकारचे बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कार्यकर्त्वुत्वाचा आढावा घेणारा कार्यक्रम पिंपळे सौदागर येथे उत्साहात संपन्न झाला.

येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या वतीने बुधवार दि. २७ रोजी सायंकाळी सावरकर यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शैलजा देवरस, राजेंद्र देशमुख, लक्ष्मी पारखी, अनुराधा निलेगावकर आणि सुनील खडके यांच्याहस्ते श्री संत ज्ञानेश्वर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दिप्रज्वन करण्यात आले. भारती न्यायाधीश यांनी 'ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' हे गीत सादर करुन सावरकर यांना मानवंदना दिली. सुभाष काळे यांनी कवितेच्या माध्यमातून सावरकरांविषयी आदरभाव व्यक्त केला. त्यानंतर शैलजा देवरस यांनी आपल्या छोटेखानी भाषणातून सावरकरांच्या कार्याचा आढावा घेत राष्ट्रप्रेमाचे महत्व विषद केले. भावना बुजोणे यांनी हिंदुत्ववादी विचारांची मांडणी केली.

पुण्यातील पैगंबर शेख याने सोशल मिडियावरुन स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासंबंधी जे अपशब्द वापरले त्याचा राजेंद्र कुलकर्णी यांनी निषेध व्यक्त करुन त्यासंदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्याची सुचना केली. अध्यक्षीय समारोप संस्थेचे अध्यक्ष विलास जोशी यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता कुलकर्णी आणि स्नेहा चिंचवडकर यांनी केले तर अनुराधा निलेगावकर यांनी आभार मानले. वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेतर्फे सावरकर जयंती उत्साहात

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) – जाज्वल्य देशाभिमानी, प्रखर राष्ट्रभक्त, थोर स्वातंत्र्य सैनिक, धडाडीचे क्रांतीकारक, उत्तुंग प्रतिभा लाभलेले लेखक आणि कवी अशा प्रकारचे बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कार्यकर्त्वुत्वाचा आढावा घेणारा कार्यक्रम पिंपळे सौदागर येथे उत्साहात संपन्न झाला.

येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या वतीने बुधवार दि. २७ रोजी सायंकाळी सावरकर यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शैलजा देवरस, राजेंद्र देशमुख, लक्ष्मी पारखी, अनुराधा निलेगावकर आणि सुनील खडके यांच्याहस्ते श्री संत ज्ञानेश्वर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दिप्रज्वन करण्यात आले. भारती न्यायाधीश यांनी ' ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला ' हे गीत सादर करुन सावरकर यांना मानवंदना दिली. सुभाष काळे यांनी कवितेच्या माध्यमातून सावरकरांविषयी आदरभाव व्यक्त केला. त्यानंतर शैलजा देवरस यांनी आपल्या छोटेखानी भाषणातून सावरकरांच्या कार्याचा आढावा घेत राष्ट्रप्रेमाचे म हत्व विषद केले. भावना बुजोणे यांनी हिंदुत्ववादी विचारांची मांडणी केली. पुण्यातील पैगंबर शेख याने सोशल मिडियावरुन स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासंबंधी जे अपशब्द वापरले त्याचा राजेंद्र कुलकर्णी यांनी निषेध व्यक्त करुन त्यासंदर्भात म हाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्याची सुचना केली.

अध्यक्षीय समारोप संस्थेचे अध्यक्ष विलास जोशी यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता कुलकर्णी आणि स्नेहा चिंचवडकर यांनी केले तर अनुराधा निलेगावकर यांनी आभार

मानले. वंदे मातरमब गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) – महानगरपालिकेच्या वतीने आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित अभिवादन करण्यात आले.

समर्थनगर येथील वीर सावरकर यांच्या पुतळ्यास मा महापौर श्री समीर राजुरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेता गोविंद केंद्रे, माजी महापौर बापू घडामोडे, स. नगरसेवक अशोक दामले, जालिंदर शेंडगे, नगरसेविका कीर्ती शिंदे, अनिता मानकापे, डॉ.उज्वला दहिफळे, शैलेश नीलकंठ, उप आयुक्त लाखिचंद चव्हाण, माहिती व जनसंपर्क विभागाचे रविंद्र खरात, अतुल बनकर आदींची उपस्थिती होती.


# क्रांतिकारकांचे कुलपुरुष वि.दा. सावरकर यांना वाचनालयात वाचकांचे अभिवादन



वैजापूर, दि. २८ (प्रतिनिधी) – भारतीय क्रांतिकारकांचे कुलपुरुष क्रांतीवीर विनायक दामोदर सावरकर(वि.दा. सावरकर) यांच्या १४३व्या जयंती निमित्त पालिकेच्या वैजिनाथ वाचनालयात वाचक व जेष्ठ नागरिक यांनी गुरुवार(ता,२८)रोजी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रथम जेष्ठ वाचक सेवा निवृत्त शिक्षण केंद्र प्रमुख अधिकारी यु.बी. पारखे,व जेष्ठ नागरिक ईश्वरलाल शिंपी यांनी अभिवादन केले.माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी वि.दा.सावरकर यांच्या सशस्त्र क्रांती मार्गाचा इतिहास सांगून त्यांचे साहित्य म्हणजे धगधगते अग्निकुंड होय असे प्रतिपादित केले.या प्रसंगी ग्रंथालय सहायक संजय. व्ही. राजपूत तसेच विजय पडवळ, कारभारी नवगिरे, अनिल शेजुळ, अविनाश गडाख, रवींद्र साळुंके, श्री राजळे व वाचक तथा जेष्ठ नागरिक उपस्थित होते. शेवटी ग्रंथालय सहायक एस. व्ही.राजपूत यांनी आभार मानले.

# !!पचनक्रिया सक्षम : शरीरावयव भक्कम!!

**पचन ही एक रासायनिक प्रक्रिया आहे, ज्यात आपण खाल्लेले अन्न पचनग्रंथींच्या स्रावांच्या संमिश्रणाने सरल रेणूंमध्ये रुपांतरित होते. ही संस्था अन्ननलिका तोंडापासून सुरू होऊन पुढे घसा, जठर, लहान आतडे, मोठे आतडे आणि गुदद्वार अशी बनलेली असते. त्यांत लाळ उत्पादक ग्रंथी, जठर, यकृत, स्वादुपिंड, आणि लहान आतडे यांचा समावेश असतो. स्वत: डॉक्टर नसूनही 'माझे आरोग्य, माझ्याच हाती' या उक्तीप्रमाणे श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींनी खास वाचकांच्या सेवेत सदर संकलित लेख प्रस्तुत करताहेत... संपादक.**



**(आंतरराष्ट्रीय पचन स्वास्थ्य–आरोग्य दिन.)**

डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आरोग्याची काळजी घेण्याच्या काही महत्त्वाच्या टिप्स– निरोगी आहार व विहार जीवनशैली योग्य असणे आवश्यक. फळे, पालेभाज्या, फायबरयुक्त आहार घेणे गरजेचे. शरीरासाठी पाणी हे अमृतासारखे आहे. दिवसभरात कमीतकमी पाच लिटर पाणी प्यावे. योग्य प्रमाणात पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते. रोजच्या जेवणात स्निग्ध पदार्थ, सकस, संतुलित, नियमित, पुरेसा आणि ताजा आहार व्यक्तीला मिळाल्यास आरोग्य सुधारते. आहारावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते. आहारातील स्वच्छतेमुळे आरोग्याला पोषक स्थिती निर्माण होते. अस्वच्छतेम धून मलेरिया, गॅस्ट्रो आदीसारखे रोग उद्भवतात. वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवर व्यक्तीने स्वच्छतेसंबंधी काळजी घेतली पाहिजे. ज्यामुळे आरोग्य चांगले राहते. सुयोग्य मनोरंजनामुळे व्यक्तीला शारीरिक, मानसिक स्वास्थ्य लाभते. नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. व्यायामामुळे आरोग्य व्यवस्थित–सुदृढ राहते. व्यायामासोबतच विश्रांतीही तेवढीच महत्त्वाची आहे. आरोग्य आणि विश्रांती या दोन्ही प्रक्रियांचा आंतरिक सहसंबंध आहे.

आरोग्य किंवा तब्बेत हा शब्द असा आहे की, त्याचा अर्थ काय? हे आपणा सगळ्यांना माहित आहे. पण ते नेमक्या शब्दांत सांगता ये नाही. आरोग्य किंवा स्वास्थ्य म्हणजे जेव्हा शरीर आणि मन व्यवस्थित असते म्हणजेच कोणताही रोग, आजार वा वेदना नसतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या दृष्टीने आरोग्य म्हणजे नुसता रोगांचा अभाव नसून ती एक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक समतोलाची अवस्था आहे. खाल्लेल्या अन्नाचे पचन व्यवस्थित झाले तरच स्वास्थ्य व्यवस्थित राहते. २९ मे रोजी जागतिक पचन स्वास्थ्य दिवस आहे. आपली पचनक्रिया स्वस्थ असेल तर आपले आरोग्य देखील चांगले–स्वस्थ राहते. कारण ९० टक्के आजाराचे मूळ पचनक्रियांशी संलग्न असते. मनुष्याचे शरीर स्वस्थ तेव्हाच असते जेव्हा पचनक्रिया व्यवस्थित असेल. जेव्हा शरीर आणि मन हे दोन्ही व्यवस्थित असतात तरच आपण आपली नेहमीची कामे नीट, व्यवस्थित करू शकतो.

आरोग्य चांगले राहण्यासाठी आपले शरीरही निरोगी हवे. मनाची उभारीही असावी आणि सामाजिक आरोग्याची स्थिती देखील चांगली असावी. चांगली तब्बेत किंवा आरोग्य म्हणजे नुसता औषधोपचार नाही तर आनंदी व सुखी जीवनही व्यवस्थित असणे महत्त्वाचे आहे. अशी शरीराची आणि मनाची अवस्था असते. भक्कम शरीर म्हणजे ज्यावेळी शरीर संपूर्णपणे काम करण्यास सक्षम असते. आपल्या शरीराचा एखादा अवयव नीट काम करत नसेल तर म्हणजेच डोळ्यांना जर नीट दिसत नसेल, कमी ऐकू येत असेल, खांदे दुखत असतील तरी आपण कामे करतच राहतो. पण ज्याला हा कोणताच त्रास नसतो, तो जास्त आणि चांगले काम करू शकणार नाही का? आरोग्य ही संकल्पना अत्यंत व्यापक अर्थाने उपयोगात आणली जाते. आरोग्य म्हणजे स्थुल मानाने शारीरिक, मानसिक, सामाजिक संतुलनाची स्थिती होय. आरोग्यास असंतुलन निर्माण झाल्यास रोग– व्याधी जडतात. जी व्यक्ती आपली सामाजिक भूमिका सुव्यवस्थित पार पाडण्यास शारीरिक, मानसिक दृष्ट्या सक्षम असते. ती आरोग्यसंपन्न मानली जाते. म्हणून आरोग्य ही संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण आहे. याविषयावर डॉक्टर म्हणतात की, आपली पचनक्रिया स्वस्थ असेल तर आपले आरोग्य देखील स्वस्थ राहते. कारण बहुसंख्य व्याधींना कारणीभूत पचनक्रियाच असते. पचनक्रिया चांगली राहण्यासाठी निरोगी आहार व विहार जीवनशैली योग्य असणे अत्यावश्यक आहे. व्यक्तीची पचनक्रियाच काम सुरळीतपणे पार पाडत नसेल तर त्यास अपचनाचा आजार जडतात. जसे की, आम्लपित्त, उलटी, जुलाब, जाडेपणा, मधुमेह. त्यासाठी आहार हा पौष्टिक असावा लागतो. निरोगी राहणे हे व्यक्तीच्या सात्विक जीवनशैली आणि पौष्टिक आहार यांवर अवलंबून असते. पचनशक्ती सशक्त राहण्यासाठी फळ, पालेभाज्या आणि फायबरयुक्त आहार घेणे गरजेचे असते. रोजच्या जेवणात जास्त मेदयुक्त पदार्थ खाऊ नयेत. त्यामुळे पचनक्रिया मंदावते. शरीरासाठी पाणी हे अमृतासमान आहे. योग्य प्रमाणात पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते आणि पोट साफ होण्यास मदत होते. जर शरीरामध्ये पाण्याचे प्रमाण कमी असेल, तर पचन संस्था व्यवस्थित कार्य करत नाही. त्यामुळे पित्ताचा त्रास उद्भवतो. खाण्यापिण्यासोबतच धूम्रपान आणि मद्यपान सेवन करू नये. काम ातील ताणतणाव टाळावे. रोज तीन वेळा व्यवस्थित आणि वेळेवर जेवण करावे. प्रत्येकांनी व्यायाम नियमित करणे गरजेचे आहे.

!! आंतरराष्ट्रीय पचन स्वास्थ्य दिनाच्या सर्व भावाबहिणींना निरामय जीवनाकरीता हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!


– संकलन व सुलेखन –

**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी. (दिनविशेषकार)**

गडचिरोली, फक्त व्हॉट्सॲप– ९४२३७१४८८३.

# आता उघड्यावर उपोषण, आरपारची लढाई –जरांगे पाटलांचा इशारा!

अंतरवली सराटी, दि. २८ (प्रतिनिधी) – मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे पाटील यांनी सरकार सोबत आता आरपार ची लढाई लढण्याचा ईशारा दिला आहे. आता मंडप, कुलर लावून नव्हे तर उघड्यावर भर उन्हात आमरण उपोषण केले जाईल. एकतर मी राहिलं नाहीतर देवेंद्र फडणवीस असा ईशारा पाटील यांनी दिला आहे. सरकारने गेल्या दहा महिन्यात आपली आणि समाजाची फसवणूक केल्याचा आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला. सरकारला पुरेसा वेळ दिल्याचा उल्लेख करत जरांगे यांनी आता कठोर पाऊल उचलण्याची गरज असल्याचे सांगितले.



**सरकार जबाबदार राहील** – जरांगे म्हणाले की, तीन वर्षांपासून आंदोलन सुरू असताना सरकार चर्चेसाठी सतत वेळ मागत आहे. आता थांबता येणार नाही. उष्म ाघाताने आपला बळी गेला तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संपूर्ण सरकार जबाबदार राहील, असा इशारा त्यांनी दिला. मराठा समाजातील मुलांचा उन्हाळा करून टाकल्यामुळे आता माघार घेण्याचे प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**मराठा समाजाला विनंती** – मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला विनंती केली आहे की, उपोषण स्थळी कोणी येऊ नये. सरकार मराठा समाजाला संभ्रमात ठेवण्याचा डाव खेळत असल्याचे त्यांचे मत आहे. उपोषण स्थळी फक्त पत्रकारांसाठी एक छोटा मंडप उभारला जाईल, बाकी संपूर्ण उपोषण उघड्या उन्हातच होईल. देशात कुठेही न झालेल्या प्रकारचे हे आंदोलन असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**सरकारच्या दिरंगाईचा आरोप**– जरांगे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. सातारा गॅझेटचा निर्णय अद्याप झालेला नाही. एका महिन्याच्या मुदतीत माहिती देण्याचे आश्वासन दिले होते, तरी दहा म हिने उलटले तरी काहीच झाले नाही. गुन्हे दाखल करून आंदोलकांवर दबाव टाकला जातो, पण गुन्हे मागे घेतले जात नाहीत. मराठा–कुणबी एकच आहेत, असे वारंवार सांगितले जाते, तरीही एकत्रित जीआर काढला जात नाही. मराठा–कुणबी मंत्रालय स्थापन करण्यासाठी किती वेळ लागणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. १९६७ पासून अन्याय – १९६७ पासून सरकारने मराठा समाजाचे वाटोळे केल्याचा आरोप जरांगे यांनी केला. समाजाचे नुकसान कोण भरून काढणार, असा सवाल करत त्यांनी आरक्षणासाठी मोर्चे, आंदोलने, कायदेशीर लढाई सर्व काही केल्याचे सांगितले. तरीही आरक्षण मिळाले नाही. फक्त मतांसाठी म राठा समाजाची गरज असते का, असा खडा सवालही त्यांनी केला.

**आरपारची लढाई** – जरांगे यांनी स्पष्ट केले की, आता आरपार खेटण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. कायद्याच्या चौकटीत राहूनच हे उपोषण होईल. मराठा समाजाला यामुळे वाईट वाटू शकते, पण परिस्थितीमुळे कठोर भूमिका घेणे भाग पडत आहे. या पत्रकार परिषदेत मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आता शेवटच्या टप्प्यात जाण्याची तयारी दर्शवली आहे. सरकारकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त करतानाच, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र होईल, याचा इशाराही दिला आहे.

# दोन वर्षांपासून प्रलंबित ग्रामनिधी अपहार प्रकरण निकाली काढण्याची मागणी

- विरगाव–मुर्शदपूर ग्राम पंचायतीतील अपहाराची चौकशी रखडली
- चौदावा वित्त आयोग निधीतील गैरव्यवहार कारवाईची मागणी
- बनावट बिलांद्वारे निधी अपहार? संबंधितांवर गुन्हे दाखल करा
- ग्रामविकास अधिकारी, सरपंचांसह संबंधितांवर कारवाईची मागणी

छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) – वैजापूर तालुक्यातील विरगाव–मुर्शदपूर ग्रुप ग्रामपंचायतीतील चौदावा वित्त आयोग व ग्रामनिधीतील कथित आर्थिक अपहार प्रकरणी संबंधित ग्रामविकास अधिकारी, सरपंच, सदस्य व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी समाज सेवा मंचाचे अध्यक्ष आर. पी. थोरात यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ग्रामपंचायतीत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत पंचायत समिती वैजापूरमार्फत विविध चौकशी अहवाल सादर करण्यात आले आहेत. चौकशीमध्ये चौदावा वित्त आयोगाच्या निधीतून सुमारे नऊ लाखांहून अधिक रकमेचा अपहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच ग्रामनिधीतून ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व इतरांच्या नावावरून लाखो रुपये काढण्यात आल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी सहाय्यक गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दोन टप्प्यांत चौकशी करून अहवाल सादर केला असला तरी अद्याप अपहाराची निश्चित रक्कम व संबंधितांचा कार्यकाळ निश्चित करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रकरण गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

दरम्यान, बनावट बिलांच्या माध्यमातून शासकीय निधी काढल्याचेही चौकशीत समोर आले असून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अपहाराची रक्कम पगार, पेन्शन व मालमत्तेतून वसूल करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# प्रचंड उष्णतेत सावध राहा; पंतप्रधान मोदींचा देशवासियांना महत्त्वाचा संदेश

नवी दिल्ली, दि. २८(वृत्तसंस्था) – देशभरात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान छरीशपवीर चेवळ यांनी देशवासियांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. भीषण उकाडा आणि वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, स्वतःला हायड्रेटेड ठेवावे आणि घराबाहेर पडताना पाणी सोबत ठेवावे, असे त्यांनी म्हटले आहे.

पंतप्रधानांनी नागरिकांना केवळ स्वतःचीच नव्हे तर समाजातील इतरांचीही काळजी घेण्याचे आवाहन केले. एखाद्या तहानलेल्या व्यक्तीला एक ग्लास पाणी देणे ही मोठी मानवसेवा ठरू शकते, असे सांगत त्यांनी घराबाहेर, दुकानांसमोर किंवा सार्वजनिक ठिकाणी पाण्याचे मडके ठेवणाऱ्यांचे कौतुक केले. उष्माघात, चक्कर येणे, मळमळ किंवा अतिशय थकवा जाणवणे यासारखी लक्षणे दुर्लक्षित करू नयेत, असा इशाराही त्यांनी दिला. एखादी व्यक्ती अचानक बेशुद्ध पडल्यास किंवा अशक्त वाटत असल्यास तिला तात्काळ सावलीत किंवा थंड जागी हलवून पाणी, जठड किंवा इतर द्रवपदार्थ द्यावेत, असे आवाहन त्यांनी केले. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि उन्हात काम करणारे कामगार हे सर्वाधिक धोक्यात असल्याचे सांगत, योग्य वेळी काळजी घेतली नाही तर ही स्थिती 'हीटस्ट्रोक'सारख्या गंभीर समस्येत रूपांतरित होऊ शकते, असे मोदी यांनी स्पष्ट केले. याचबरोबर त्यांनी कुटुंबातील आई–वडील, आजी–आजोबा आणि इतर प्रियजनांची विचारपूस करण्याचे आवाहन करत, त्यांना पुरेसे पाणी पिण्याचा आणि दुपारच्या कडक उन्हात बाहेर न पडण्याचा सल्ला देण्यास सांगितले. मानवांसोबतच पशु–पक्ष्यांचीही काळजी घेण्याचे आवाहन करताना त्यांनी घर, गच्ची, बाल्कनी, दुकान किंवा कार्यालयाबाहेर पाण्याचे छोटे भांडे ठेवण्याचे आवाहन केले. ङ्गया कठीण काळात संवेदनशीलता आणि करुणा जपणे हीच खरी माणुसकी आहे,ङ्घ असा भावनिक संदेश पंतप्रधानांनी देशवासियांना दिला. या प्रचंड उष्णतेत एक ग्लास पाणी आणि थोडीशी माणुसकीः कुणाचातरी जीव वाचवू शकते!

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# शहरात स्वातंत्र्यवीर सावरकर १४३ वी जयंती मोठ्या स्वरूपात साजरी

छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- स्वातंत्र्यवीर सावरकर १४३ वी जयंती महोत्सव समिती छत्रपती संभाजीनगर तर्फे समर्थ नगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्याला सकाळी ८ वा पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शहरात विविध पक्ष, संस्था, संघटना यांच्या वतीने सावरकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी प्रामुख्याने मंत्री अतुल सावे, महापौर समीर राजुरकर, सभापती अनिल मकरीये, माजी खासदार चंद्रकांत खैरे, किशोर शितोळे, सुभाष पाटील, स्वातंत्र्यवीर सावरकर महोत्सवाचे अध्यक्ष जालिंदर शेंडगे, निमंत्रक भाऊ सुरडकर, प्रदीप बुरांडे, किशोर मानकापे, आनंद तांदूळवाडीकर, प्रमोद सरकटे, सुधीर नाईक, गोविंद कुलकर्णी, सुभाष कुमावत, किरण सराफ, विजय जहागीरदार, सुहास ठोसर, राजेश मेहता, अभिषेक कादी, सागर निळकंठ, संजय मांडे, सचिन गुळवे, गोपाल कुलकर्णी, दिगंबर मोरे, जगदीश हर्सुलकर, योगेश वाणी, मुरलीधर डोळे, जेजुरकर, राजेंद्र दानवे, अनिल पोलकर, सौ. कीर्ती शिंदे, अमृता पालोदकर, माधुरी अदवंत, शिल्पा राणी वाडकर, अनिता मानकापे, विजया कुलकर्णी, क्रांती देशमुख, साधना सुरडकर, स्मिता जोशी, यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नवीन वीजजोडणी शिबिरास प्रतिसाद




छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- महावितरणच्या छावणी उपविभागातील नवीन वीजजोडणी घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी आयोजित शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला. २५ मे व २६ मे रोजी छावणी उपविभाग कार्यालयात हे विशेष शिबिर झाले. शिबिरात छावणी, पडेगाव, रेल्वे स्टेशन, सातारा, नक्षत्रवाडी शाखेच्या परिसरातील २०० घरगुती व व्यवसायिक ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यात आली. तसेच जवळपास ८०० सोलर ग्राहकांनाही जोडणी देऊन मीटर बसवण्यात आले. शिबिरात ३५८ ग्राहकांनी नवीन वीजजोडणीसाठी अर्ज केला. त्यांना जोडणी देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. शिबिरात ४१० ग्राहकांना कोटेशन देण्यात आले. शहर-१ विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक अभियंता प्रदीप निकम, संजय सरताळे, किशोर पवार, संतोष सुर्वे, कनिष्ठ अभियंता रवींद्र वाघ व छावणी उपविभातील सर्व कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# रुग्णवाहिकेस डिझेल न मिळाल्याने हिंगोली जिल्ह्यात नवजात बालकाचा मृत्यू

हिंगोली दि.२८ (प्रतिनिधी)- औंढा नागनाथ तालुक्यातील नालेगाव येथे शासकीय रुग्णवाहिकेस डिझेल मिळाल्याने एका नवजात बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र डिझेल न मिळण्याचे कारण नसून वाहन चालक उपलब्ध नव्हता असे कारण रुग्णालय प्रशासनाकडून दिले जात आहे. नालेगाव येथील सात महिन्याच्या गरोदर मनिषा इंगळे यांना प्रसुती वेदना होत असताना पाच किलोमीटर दुचाकीवरुन प्रवास करावा लागला. परिणामी त्यांचे नवजात मूल दगावले. हिंगोलीतील या घटनेमुळे आरोग्य व्यवस्था आणि दळणवळणातील इंधन तुटवड्याची भिषणता समोर आली आहे.

नालेगाव येथील मनिषा इंगळे या सात महिन्यांच्या गरोदर होत्या. मंगळवारी अचानक त्यांना तीव्र पोटदुखी सुरू झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना दुचाकीवरून जवळाबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले.

प्रसुती वेदना सुरू असताना पाच किलोमीटरचा दुचाकीवरुन करावा लागला. प्राथमिक तपासणीनंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तातडीने हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्याचा सल्ला दिला. यानंतर कुटुंबीयांनी १०२ आणि १०८ क्रमांकावर वारंवार संपर्क साधूनही तातडीची रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. वेळ न दवडता खासगी रुग्णवाहिकेच्या मदतीने महिलेला हिंगोली येथे हलविण्यात आले. मात्र तेथे सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर नवजात बालक मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी "वेळेवर रुग्णवाहिका मिळाली असती तर बाळाचा जीव वाचला असता," असा आरोप करत आरोग्य प्रशासनाच्या निष्काळजीपणावर बोट ठेवले आहे. दुसरीकडे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण यांनी "रुग्णवाहिकेत डिझेल होते, मात्र चालक नव्हता. तसेच महिलेच्या गर्भाशयात अतिरिक्त पाणी साचल्याने गुंतागुंत निर्माण झाली होती," असे स्पष्टीकरण दिले.

दरम्यान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. या अनुषंगाने जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

# पोलीस आयुक्तालयात महिलेचा आत्मदहनाचा प्रयत्न



छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- फसवणूक प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी आज सकाळी एका महिलेने पोलिस आयुक्तालयासमोर पेट्रोल अंगावर ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. या प्रकाराने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

निशा गोपाल सोनी रा. नासगल्ली औदुंबर अपार्टमेंन्ट, असे सदर महिलेचे नाव आहे. महिलेने पोलिस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आरोपी नागेश सोपान खाडे रा. बाळापूर फाटा बीड बायपास याने एक एकर शेत, प्लॉट विक्री करण्याच्या नावाखाली महिलेची आर्थिक फसवणूक केली आहे. तसेच सोपान खाडे यांने विनयभंगही केलेला आहे. मात्र पोलीसात वारंवार तक्रार करूनही न्याय मिळाला नाही.

मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात यासह सिटीचौक ठाण्यातही तक्रार केली. मात्र आरोपीवर गुन्हा झाला नाही. त्यामुळे आज सदर महिलेने टोकाचे पाऊल उचलत आत्मदहनाचा प्रयत्न केला.

# चुकीच्या ई-चलानविरोधात ऑनलाइन हरकत; पोलिसांना ४५ दिवसांत द्यावे लागणार उत्तर




नागपूर दि.२८ (प्रतिनिधी)- वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर ई-चलानद्वारे दंड आकारला जातो. मात्र अनेक वेळा चुकीचे चलान पाठवण्यात आल्याच्या तक्रारी वाहनचालकांकडून करण्यात येतात. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने आता ई-चलानवर हरकत नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पोलीस विभागाला ४५ दिवसांच्या आत या हरकतीचे निराकरण करावे लागणार आहे.

वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक विभागाकडून स्वयंचलित यंत्रणा आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. अनेक चौकांमध्ये सिग्नल तोडणे, हेल्मेट न वापरणे, सीट बेल्ट न लावणे यांसारख्या नियमभंगाची नोंद कॅमेऱ्यांद्वारे केली जाते. तसेच महामार्गांवर वेगमर्यादा मापक यंत्रे बसविण्यात आली असून, वेगमर्यादा ओलांडल्यास संबंधित वाहनमालकाला ई-चलान पाठवले जाते.

मात्र, वाहन संबंधित ठिकाणी नसताना किंवा कोणताही नियमभंग न करताही ई-चलान आल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. त्यामुळे आता सरकराने या ई-चलानवर हरकत नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

'महाराष्ट्र राज्य ई-चलानाचे प्रदान करणे' या शीर्षकाच्या पृष्ठावर तक्रारदार व्यक्तीला 'चुकीच्या पद्धतीने नोंदविलेले चलान किंवा प्रदानाच्या कोणत्याही समस्येसाठी तक्रारीवर हरकत घेण्याकरिता येथे क्लिक करा' हा पर्याय निवडावा लागणार आहे.

येथे चलानाच्याबाबतीत हरकत घेण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांचे अनुसरण करावे लागणार आहे. यात पोलीस ठाण्याचीही निवड करायची आहे. पोलीस विभागाला ४५ दिवसांच्या आत या हरकतीचे निराकरण करावे लागणार आहे. गृह विभागाकडून याबाबतची अधिसूचना काढण्यात आली आहे.

## (पान १ वरुन)

### पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट...

व डिझेलचे दर वाढवले जात आहे. आज पेट्रोल डिझेलचे दर पुन्हा वाढले आहेत. पेट्रोल २ रुपये ६१ पैशांनी तर डिझेल २ रुपये ७१ पैशांनी वाढले आहे. मागील १० दिवसांत सलग चौथ्यांदा ही वाढ केली जात आहे. आज घडीला मुंबईत १११.१२ रू. प्रति लिटर पेट्रोल मिळत आहे तर डिझेल ९६.८६ रु. प्रति लिटर मिळत. त्यामुळे या महागाईमुळे सामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. या संकटसमयी आपण पुढाकार घेऊन नागरिकांना दिलासा दिला पाहिजे."

### नक्षलवाद्यांचा शस्त्रनिर्मिती...

शस्त्रनिर्मितीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांकडून मिळालेल्या गुप्त माहितीनंतर 'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत ही संयुक्त कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली २६ मे रोजी या मोहिमेचे नियोजन करण्यात आले. छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यातील काकूर पोलीस ठाण्यापासून सुमारे सात किलोमीटर अंतरावरील घनदाट जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी जमिनीखाली शस्त्रे आणि स्फोटके लपवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गडचिरोली विशेष अभियान पथक 'सी-६०', नारायणपूर डीआरजी तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथकाने संयुक्तरीत्या शोधमोहीम हाती घेतली.

२७ मे रोजी राबविण्यात आलेल्या कारवाईदरम्यान सुरक्षा दलांच्या हाती मोठा शस्त्रसाठा लागला. जप्त साहित्यामध्ये एक इन्सास रायफल, दोन सिंगल शॉट रायफल, दोन बारा बोअर रायफल आणि १८ जिवंत काडतुसे आढळून आली. याशिवाय शस्त्रनिर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या दोन लेथ मशीन, दोन मोटर, ग्राइंडर मशीन, इन्व्हर्टर, बॅटऱ्या, लोखंडी सळ्या आणि सोलर प्लेट्सही जप्त करण्यात आल्या. स्फोटक साहित्यामध्ये २५ किलो आयईडी, दोन क्लेमोर माईन्स, ११० डेटोनेटर, कॉर्टेक्स वायर आणि ५०० हून अधिक बीजीएल सेल्सचा समावेश आहे. तसेच सात बीजीएल लॉंचर आणि तीन ट्यूब लॉंचरही हस्तगत करण्यात आले.

नक्षलवाद्यांनी घातपाती कारवाया घडवून आणण्यासाठी आणि सुरक्षा दलांना लक्ष्य करण्याच्या उद्देशाने हे साहित्य जंगलात लपवून ठेवले होते. कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेल्या शस्त्रनिर्मितीच्या अवजड यंत्रसामग्रीचा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार घटनास्थळीच नाश करण्यात आला. पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी सांगितले की, गडचिरोलीतील नक्षलवादी चळवळ आता अखेरच्या टप्प्यात पोहोचली आहे. सीमावर्ती दुर्गम जंगलांचा आधार घेत नक्षलवादी अशा प्रकारचे कारखाने चालवत होते. मात्र, पोलिसांनी त्यांची संपूर्ण यंत्रणा उद्ध्वस्त करण्याचा निर्धार केला आहे. अपर पोलीस अधीक्षक कार्तिक मधिरा, गोकुल राज जी., हर्षवर्धन बी. जे. तसेच त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईमुळे नक्षलवादी चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

### सिद्धारामय्या यांचा कर्नाटकच्या...

केलं आहे. २०१३ मध्ये आम्ही १६३ आश्वासनं दिली होती. त्यापैकी आम्ही १५८ आश्वासनं पूर्ण केले आहेत. २०२३ मध्ये आम्ही ५५० पेक्षा जास्त आश्वासनं दिली होती. त्यापैकी आम्ही जवळपास ३०० आश्वासनं पूर्ण केली आहेत. याशिवाय आम्ही ५ हमी योजना जाहीर केल्या आहेत, ज्या आम्ही पहिल्याच वर्षात पूर्ण केल्या आहेत", असंही सिद्धरामय्या यांनी यावेळी स्पष्ट केलं.

### मुख्यमंत्र्यांवर टीका करून...

भेटीत दूर करणार असल्याचे विखे यांनी स्पष्ट केले.

सन २०१४ ते २०१९ या काळात फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाला दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले होते. समाजाच्या भावना लक्षात घेऊन सरकारने कार्यवाही केली, परंतु मधल्या काळात दुर्दैवाने महाविकास आघाडी सरकारला आरक्षण टिकवता आले नाही. पुन्हा महायुती सरकार सत्तेवर आल्याने प्रयत्न सुरू झाले असून, जरांगे पाटलांच्या मागणीनुसार सरकारने हैदराबाद गॅझेटही जाहीर केल्याकडे विखे यांनी लक्ष वेधले.

कायद्याच्या चौकटीत राहूनच आरक्षणाचा निर्णय करावा लागणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनीच समाजाला आरक्षण दिले आणि आताही तेच देणार आहेत. त्यांच्यामुळेच आरक्षणाच्या मागणीवर मार्ग निघत आहे. उपोषण हा काही एकमेव मार्ग नसून, जरांगे पाटलांच्या बहुतांशी मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत, तर अन्य मागण्यांवर कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### राज्यात ईदचा उत्साह; मुस्लिम...

शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी, अशीही प्रार्थना करण्यात आली. अनेक ठिकाणी ईदनिमित्त गरजूंना मदत, अन्नदान आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यंदाच्या ईदला आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अनेक भागांत विशेषतः पंढरपुरात मुस्लिम समाजाने एकादशीचा आदर राखत कुर्बानी न देण्याचा निर्णय घेतला. काही ठिकाणी धार्मिक सौहार्द अबाधित राहावे आणि कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण होऊ नये, यासाठी समाजबांधवांनी संयमाची भूमिका घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे राज्यभरातून सामाजिक ऐक्याचा सकारात्मक संदेश गेला. विविध राजकीय, सामाजिक आणि धार्मिक संघटनांनीही नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले होते.

### राज्याच्या विकासकामासाठी..

महाराष्ट्रातील कांदा आणि ऊस उत्पादकांचे प्रश्न असोत किंवा जलजीवन मिशनचे प्रलंबित प्रकल्प; राज्याचे प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी आम्ही केंद्राकडे जाणार नाही तर कोणाकडे जाणार?' अशी विचारणा एकनाथ शिंदेंनी केली.

एकनाथ शिंदे म्हणाले, 'जनतेच्या हितासाठी केंद्राशी संवाद साधण्यात आम्हाला कोणताही कमीपणा वाटत नाही. अगोदरच्या सरकारला केंद्राशी बोलणे किंवा मदत मागणे कमीपणाचे वाटत असेल, पण आमची तशी भूमिका नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी महाराष्ट्रासाठी नेहमीच मदतीचा हात दिला असून राज्याच्या विकासासाठी हजारो कोटींचा निधी केंद्राकडून मिळाला आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

या दिल्ली दौऱ्यात प्रामुख्याने कांदा उत्पादक आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडीअडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, ग्रामीण भागातील घराघरांत पाणी पोहोचवणाऱ्या 'जलजीवन मिशन' अंतर्गत रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसोबत बैठक घेण्यात आली. या सर्व बैठका अत्यंत सकारात्मक झाल्या असून केंद्राकडून या प्रश्नांवर लवकरच तोडगा निघेल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

### कांद्याला दीड नाही ३ हजार...

म्हणाले.

कांद्याप्रश्नी दिल्लीत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांना महाराष्ट्राचे अर्धे मंत्रिमंडळ भेटले पण महाराष्ट्राला त्यांनी वाटाण्याच्या अक्षताच दिल्या. सरकार १५०० रुपयाने कांदा खरेदी करण्याचे सांगत आहे पण ३००० रुपये प्रति क्विंटल भाव व नाफेडमार्फत कांदा खरेदी केली पाहिजे आणि शेतकऱ्यांचा सर्व कांदा खरेदी केला पाहिजे, ही शेतकऱ्यांची मागणी आहे. नरेंद्र मोदी २०१४ साली नाशिकला आले होते, मी कांदा खाल्ला आहे, तुमच्याशी बेईमानी करणार नाही, सत्तेत आलो की २४०० रुपये भाव देणार असे आश्वासन दिले होते, तीच री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओढली होती पण आता मात्र ते फक्त १५०० रुपये भाव देण्याची भाषा करत आहेत, ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य नाही केल्या तर पुन्हा आंदोलन करु, असा इशाराही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
**वेबसाइट:** www.truhomefinance.in

### प्रतिकात्मक ताबा सूचना

जसे की , निम्नस्वाक्षरीदार हे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात ) प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३ (१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार / सह-कर्जदार / तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.
कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि सदर नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा २७ मे २०२६ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास ट्रूहोम फायनान्स लि. (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून खाली नमूद केलेल्या रकमेसाठी व्याजासह शुल्क आकारले जाईल.
सुरक्षित मत्ता सोडवून घेण्यासाठी , उपलब्ध वेळेच्या संबंधात कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले आहे,

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१) श्री. विठ्ठल रामलू ऐतवार (कर्जदार) २) श्री. स्वप्नील विठ्ठलराव ऐतवार (सह-कर्जदार) ३) सौ. देवकीबाई विठ्ठल ऐतवार (सह-कर्जदार)**
**सर्व राहणार पत्ता :-फ्लॅट नं. २०, सारा विहार, इंडियन पेट्रोल पंप व ओएसएस चौक जवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१.**
**तसेच :-पोस्ट दुंद्रा, ता. किनवट, पो. दुंद्रा, जि. नांदेड, महाराष्ट्र - ४३१८०५.**
**तसेच :-पोस्ट तरंगण, पडेगाव, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१**
**.तसेच :-मालमत्तेचा पत्ता :- २०-डी टाईप बिल्डिंग, गट नं. १२६ व १२७, राजपूत एचपी पेट्रोल पंपाच्या मागे, वाळूज, ओएसिस चौक जवळ, पंढरपूर, बजाज नगर, वाळूज एमआयडीसी, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३११३६.**

**थकबाकी रक्कम**

कर्ज खाते क्र. SILHAURD0001142 अंतर्गत दिनांक ०९-०३-२०२६ रोजी रु. ३,३६,२१४/- (फक्त तीन लाख छत्तीस हजार दोनशे चौदा रुपये) देय आहेत.
मागणी नोटीस तारीख :- १७/०३/२०२६ सांकेतिक ताबा तारीख :- २७/०५/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग म्हणजे "सारा विहार" येथील डी-टाईप बिल्डिंगमधील फ्लॅट नं. २०, क्षेत्रफळ ५७.९१ चौ. मीटर, गट नं. १२६ व १२७, मौजे तिसगाव, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्थित असून, खालीलप्रमाणे सीमांकित आहे :-पूर्वेस :- फ्लॅट नं. १७पश्चिमेस :- ७ मीटर रुंद रस्ता दक्षिणेस :- फ्लॅट नं. १९उत्तरेस :- रो हाऊस नं. ९२

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१) श्री. अर्जुन नानासाहेब पालसकर (कर्जदार)**
**२) सौ. प्रतिभा अर्जुन पालसकर (सह-कर्जदार)**
**सर्व राहणार पत्ता :-रो हाऊस नं. १०, राठी प्लॅनेट, गट नं. ७३५, एंडोवर्ल्ड हॉस्पिटल जवळ, औरंगाबाद शहर, चिकलठाणा, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१.**
**तसेच :-नानासाहेब पालसकर यांचे सुपुत्र, जय बाबाजी चौक, पळशी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००८.**
**मालमत्तेचा पत्ता :-रो हाऊस नं. १०, राठी प्लॅनेट, गट नं. ७३५, एंडोवर्ल्ड हॉस्पिटल जवळ, औरंगाबाद शहर, चिकलठाणा, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१.**

**थकबाकी रक्कम**

कर्ज खाते क्र. SBTHAURD0000795 अंतर्गत रु. ३०,१४,९६१/- (फक्त तीस लाख चौदा हजार नऊशे एकसष्ठ रुपये), कर्ज खाते क्र. SILHAURD0000809 अंतर्गत रु. १४,११,०५८/- (फक्त चौदा लाख अकरा हजार अठ्ठावन्न रुपये) आणि कर्ज खाते क्र. STUHAURD0001194 अंतर्गत रु. ४,३३,०१६/- (फक्त चार लाख तेहेतीस हजार सोळा रुपये) दिनांक ०७-०२-२०२६ रोजी देय आहेत.मागणी नोटीस तारीख :- ११/०२/२०२६सांकेतिक ताबा तारीख :- २७/०५/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग म्हणजे राठी प्लॅनेट येथील डुप्लेक्स रो हाऊस नं. १०, क्षेत्रफळ ६७.३१ चौ. मीटर, गट नं. ७३५, चिकलठाणा, औरंगाबाद येथे स्थित असून, खालीलप्रमाणे सीमांकित आहे :-पूर्वेस :- आतील कॉलनी रस्ता पश्चिमेस :- मार्जिन स्पेस व अजित पाटणी यांची जमीन दक्षिणेस :- रो हाऊस नं. आर-८ उत्तरेस :- रो हाऊस नं. आर-११

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१) श्री. अविनाश अप्पाराव वारकरी (कर्जदार)**
**२) श्री. रविंद्र अप्पाराव वारकरी (सह-कर्जदार)**
**३) सौ. पल्लवी अविनाश वारकरी (सह-कर्जदार)**
**४) सौ. रत्नमाला अप्पाराव वारकरी (सह-कर्जदार)**
**सर्व राहणार पत्ता :-प्लॉट नं. १९, गट नं. १०२, सदाशिव नगर, सूर्य लॉन्स जवळ, बीड बायपास, देवळाई परिसर, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१.**
**तसेच :-जिल्हा परिषद, कलेक्टर कार्यालयाजवळ, जालना - ४३१२०३.**
**मालमत्तेचा पत्ता :-प्लॉट नं. १९, गट नं. १०२, सदाशिव नगर, सूर्य लॉन्स जवळ, बीड बायपास, देवळाई परिसर, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१.**

**थकबाकी रक्कम**

कर्ज खाते क्र. SLPHAURD0000625 अंतर्गत दिनांक ०७-०३-२०२६ रोजी रु. २१,३१,१०१/- (फक्त एकवीस लाख एकतीस हजार एकशे एक रुपये) देय आहेत.
मागणी नोटीस तारीख :- ०१/०३/२०२६ सांकेतिक ताबा तारीख :- २७/०५/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग म्हणजे प्लॉट नं. १९, ग्रामपंचायत मिळकत नं. १८६१, क्षेत्रफळ १८६ चौ. मीटर, गट नं. ९५ व १०२, देवळाई, औरंगाबाद येथे स्थित असून, खालीलप्रमाणे सीमांकित आहे :- पूर्वेस :- ६ मीटर रस्तापश्चिमेस :- प्लॉट नं. २४दक्षिणेस :- प्लॉट नं. २०उत्तरेस :- मोकळी जागा

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१) श्री. सुभाष देसराज जगोत्रा (कर्जदार)**
**२) सौ. मीनाक्षी सुभाष जगोत्रा (सह-कर्जदार)**
**३) श्री. अमनदीप सुभाष जगोत्रा (सह-कर्जदार)**
**सर्व राहणार पत्ता :-प्लॉट नं. २१२, शुकराला हाऊस, साउथ सिटी, सिडको महानगर २, सिडको वॉटर टँक जवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१.**
**तसेच :-प्लॉट नं. १, फ्लॅट नं. १०-आरबी, दरगा रोड, विश्वरूप हॉल समोर, उस्मानपुरा, जय नगर, औरंगाबाद - ४३१००५.**
**तसेच :-प्लॉट नं. डी-५२/१०, एमआयडीसी वाळूज, वर्धमान इंडस्ट्री जवळ, वाळूज, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३११३६.**
**मालमत्तेचा पत्ता :-प्लॉट नं. २१२, शुकराला हाऊस, साउथ सिटी, सिडको महानगर २, सिडको वॉटर टँक जवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१.**

**थकबाकी रक्कम**

कर्ज खाते क्र. SBTHAURD0000218 अंतर्गत रु. १६,७३,६४४/- (फक्त सोळा लाख त्र्याहत्तर हजार सहाशे चव्वेचाळीस रुपये), कर्ज खाते क्र. STUHAURD0000221 अंतर्गत रु. ५०,७४,९०७/- (फक्त पन्नास लाख चौऱ्याहत्तर हजार नऊशे सात रुपये) आणि कर्ज खाते क्र. STUHAURD0000352 अंतर्गत रु. ४,१९,०७६/- (फक्त चार लाख एकोणीस हजार शहात्तर रुपये) दिनांक ०७-०३-२०२६ रोजी देय आहेत.
मागणी नोटीस तारीख :- १२/०३/२०२६, सांकेतिक ताबा तारीख :- २७/०५/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग म्हणजे प्लॉट नं. २१२, क्षेत्रफळ १९२ चौ. मीटर, ग्रोथ सेंटर-I, सिडको महानगर-II, औरंगाबाद येथे स्थित असून, सर्व्हे नं. ११४ भाग, मौजे तिसगाव, औरंगाबाद अंतर्गत येणारी व खालीलप्रमाणे सीमांकित आहे :-पूर्वेस :- प्लॉट नं. २११ पश्चिमेस :- प्लॉट नं. २१३ दक्षिणेस :- ११ मीटर रुंद रस्ता उत्तरेस :- प्लॉट नं. २२२

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर
दि:- २७.०५.२०२६
स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )